**सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, एच-पूर्व विभाग, मुंबई, कार्यालय कलिना, सांताक्रुझ (पूर्व) येथील मे. दि अल्मेडा डेव्हलपर्स यांची अल्मैडा आव्हाना या इमारतीत जागा भाडेतत्वावर घेवून सदर कार्यालये स्थलांतरीत करण्यास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक : जागाभा-२०२६/प्र.क्र.४१/२२-स**
**हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,**
**मंत्रालय(वि),मुंबई-४०० ०३२.**
**दिनांक :- ०७ मे, २०२६.**

**संदर्भ** :- सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांची पत्र जा. क्र.स.आ.-१५/संवका/सहाय्यक निबंधक एच-पूर्व/कार्या. स्थलां/२६५/२०२६, दि. २०.०३.२०२६.

**प्रस्तावना :-**

सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, एच (पूर्व) विभाग, मुंबई हे कार्यालय भंडारी बँक भवन, प्र. ल. काळे गुरुजी मार्ग, दादर (प) मुंबई- ४०० ०२८ येथे भाडेतत्वावर कार्यरत आहे. अवसायक, भंडारी को, ऑप बँक लि. (अवसायनात) यांनी त्यांच्या दिनांक ०९/०९/२०२५ रोजीच्या पत्रान्वये सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, एच- पूर्व विभाग, मुंबई यांना भाडेतत्वावर असलेली जागा ही विक्री झाल्याने तात्काळ रिक्त करणेबाबत सूचित केले आहे. यास्तव सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, एच-पूर्व विभाग, मुंबई हे आव्हाना या इमारतीत असलेली रिक्त असलेली जागा भाडेतत्वावर घेण्यास व सदर कार्यालय स्थलांतर करण्यास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्याबाबत सहकार आयुक्त व निबंधक कार्यालय, पुणे यांनी संदर्भाधिन पत्रान्वये सादर केलेला प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय :-**

सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, एच (पूर्व) विभाग, मुंबई हे कार्यालय मे. दि. अल्मेडा डेव्हलपर्स यांच्या मालकीची अल्मैडा आव्हाना, सत्यम को. ऑप, हौसिंग सोसायटी लि., १ ला मजला, सीटीएस क्र. ६३८९, ६३९०,६३९१ व्हीलेज कोले कल्याण, कलिना-कुर्ला रोड, कालिना, सांताक्रुझ (पूर्व), मुंबई येथे कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई, सार्वजनिक बांधकाम विभाग, मुंबई यांनी सन २०२५-२६ या कालावधीकरिता ७९५ चौ. फूट जागेकरिता भाडे प्रति महिना रु.१,२१,६४१/- दिलेल्या वाजवी भाडे प्रमाणपत्रा प्रमाणे ७९५ चौ. फूट जागेकरिता भाडे प्रति महिना रु.१,२१,६४१/- या दराने दिनांक ०१/०४/२०२६ ते ३१/०३/२०२७ या १ वर्षाच्या कालावधीकरिता (रुपये एक लक्ष एकव्वीस हजार सहाशे एक्केचाळीस फक्त) (जी.एस.टी. वगळून) दरमहा रक्कमेच्या भाडे करारनामा करण्याच्या प्रस्तावास शासनाची प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

२. हे आदेश वित्त विभाग, वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८ मधील अ. क्र. १०, नियम ११५ अन्वये कार्यालयासाठी जागा भाड्याने घेण्यास व भाडे प्रदान करण्यास मंजूरी देण्याबाबत प्रशासकीय विभागांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

३. उक्त शासन निर्णय, महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०५०७१५२५२३०२०२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

ANKUSH PANDURANG SHINGADE

Digitally signed by ANKUSH PANDURANG SHINGADE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=CMTD, 2.5.4.20=0619305C0A0825664EFA457FFA51C3F2364841C81F8C437078A333B7111446A2, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=E11F71FCAC231B0F91F430636DE14F6C49B569D173346155B9208DCD97DD078B, cn=ANKUSH PANDURANG SHINGADE
Date: 2026.05.07 16:13:21 +05'30'

**(अंकुश शिंगाडे)**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत :-**

१. प्रधान सचिव ( सहकार व पणन ),सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग , मंत्रालय, मुंबई.
२. सहकार आयुक्त तथा निबंधक महाराष्ट्र राज्य सहकारी संस्था, पुणे.
३. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, मुंबई विभाग, मुंबई.
४. सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, एच (पूर्व) विभाग, मुंबई.
५. महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य, मुंबई.
६. महालेखापाल-२ (लेखा व अनुज्ञेयता) महराष्ट्र राज्य, नागपूर.
७. महालेखापाल-१ (लेखापरिक्षण) महाराष्ट्र राज्य, मुंबई.
८. महालेखापाल-२ (लेखापरिक्षण) महाराष्ट्र राज्य.
९. निवड नस्ती (२२-स).